पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय

## सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्र.१३)

दिनांक : २२/१२/२०२०                                        वेळ: सकाळी ११.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची माहे नोव्हेंबर २०२० ची मासिक सभा मंगळवार दिनांक २२/१२/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सींगद्वारे) आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य/ नगरसदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) मा.डोळस विकास हरीश्चंद्र | - | **सभापती** |
| २) मा.बुर्डे सुवर्णा विकास | - | सदस्या |
| ३) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन | | सदस्या |
| ४) मा.गायकवाड निर्मला मनोज | - | सदस्या |
| ५) मा.गोफणे अनुराधा देविदास | - | सदस्या |
| ६) मा.बारसे प्रियांका प्रविण | - | सदस्या |
| ७) मा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे | - | सदस्या |
| ८) मा.नितीन ज्ञानेश्वर लांडगे | - | सदस्य |
| ९) मा.फुगे भिमाबाई पोपट | - | सदस्या |
| १०) मा.बुर्डे अजित प्रताप | - | स्विकृत सदस्य |
| ११) मा.साधना सचिन तापकीर | - | स्विकृत सदस्या |

या शिवाय मा.अवधूत तावडे - क्षेत्रीय अधिकारी, मा.श्री.संजय घुबे-कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा.श्री.वसंत उगले-लेखाधिकारी, श्री.संदेश खडतरे-उपअभियंता नगररचना, श्री.बाळू लांडे-उपअभियंता विद्युत, श्री.जयकुमार गुजर-उपअभियंता नगररचना, श्रीम.प्रेरणा शिनकर - उपअभियंता स्थापत्य, श्री.राजेश नंदलाल भाट – सहा.आरोग्याधिकारी, श्री.ए.व्ही.गुमास्ते-मुख्य आरोग्य निरीक्षक, इत्यादी अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

श्री.संजय घुबे, कार्यकारी अभियंता स्थापत्य यांचेमार्फत नवनिर्वाचित सभापती मा.श्री.विकास डोळस यांचे स्वागत करण्यात आले. मा.सुवर्णा विकास बुर्डे यांनी नवनिर्वाचित सभापती यांनी मनपाचे प्रभाग क्र. ३ चे वतीने स्वागत करून शुभेच्छा दिल्या. मा.निर्मला गायकवाड यांनी नवनिर्वाचित सभापती मा.श्री.विकास डोळस यांचे स्वागत करून पुढील कामकाजासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच मा.प्रियंका बारशे यांनीही मनपाचे प्रभाग क्र.५ चे वतीने नवनिर्वाचित सभापती मा.श्री.विकास डोळस यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

मा.सभापती यांनी उपस्थित सन्मा.नगरसदस्य/ नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करून सभा सुरू करणेस अनुमती दिली.

मा.सभापती यांचे परवानगीने खालील ऐनवेळेचे विषय सभा कामकाजात समाविष्ट करण्यात आले.

विषय क्रमांक २ मा.सुवर्णा विकास बुर्डे यांचा प्रस्ताव
प्रभाग क्र.३ चऱ्होली मधील रस्त्याचे नामकरण करणेबाबत.

विषय क्रमांक ३ मा.सुवर्णा विकास बुर्डे यांचा प्रस्ताव
प्रभाग क्र.३ चऱ्होली मध्ये समाजमंदिर बांधणेस निधी उपलब्ध करून देणेबाबत.

विषय क्रमांक ४ मा.सुवर्णा विकास बुर्डे यांचा प्रस्ताव
प्रभाग क्र.३ चऱ्होली मध्ये समाजमंदिराचे नामकरण करणेबाबत.

विषय क्रमांक ५ मा.सुवर्णा विकास बुर्डे यांचा प्रस्ताव
प्रभाग क्र.३ मध्ये स.नं. ११२ व ११३ या भागात कलम २०५ अन्वये रस्ता घोषित करणेबाबत.

विषय क्रमांक ६ मा.सुवर्णा विकास बुर्डे यांचा प्रस्ताव
प्रभाग क्र.३ मध्ये स.नं. १५० ते १५५ या भागात कलम २०५ अन्वये रस्ता घोषित करणेबाबत.

विषय क्रमांक ७ मा.सुवर्णा विकास बुर्डे यांचा प्रस्ताव
प्रभाग क्र.३ मध्ये स.नं. १९६, १९१ व २०० या भागात कलम २०५ अन्वये रस्ता घोषित करणेबाबत.

विषय क्रमांक ८ मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव
भोसरी गावठाण मध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २०५ अन्वये रस्ता रुंदीकरण करणेबाबत.

विषय क्रमांक ९ मा. हिराबाई (नानी) घुले यांचा प्रस्ताव
बोपखेल मधील रस्त्यांचे नामकरण करणेबाबत.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | ४८ | विषय क्रमांक | : | ०१ |
| दिनांक | : | २२/१२/२०२० | विभाग | : | नगर रचना |
| सुचक | : | मा. निर्मला गायकवाड | अनुमोदक | : | मा.सुवर्णा बुर्डे |

संदर्भ     मा. आयुक्त यांचेकडील पत्र क्र. नरवि/कावि/११/७८/२०२० दि. २५/१/२०२०
मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे

मौजे मोशी येथील मंजूर विकास आराखड्यातील आरक्षण क्र.१/२०७ सफारी पार्क या आरक्षणाच्या पुर्वेकडील भागात व पश्चिमेकडील भागात १८.०० मी रूंद रस्ता प्रस्तावित करणेत आला आहे. तथापि दोन्ही भाग शासकीय गायरान जमीनीवरील गट नं.६४६ मधील आरक्षण क्र.१/१८९ मनपा उपयोग (उद्यान) व खाजगी निवासी भाग यामुळे वेगळे होत असून सदर पुर्वेकडील भाग व पश्चिमेकडील भाग जोडण्यास १८.०० मी रूंद रस्ता प्रस्तावित करणे आवश्यक आहे. सद्यस्थिती मा.जिल्हाधिकारी,पुणे यांचेमार्फत आदेश क्र.पमह/सीआर/७/२०१९, दि.१९/०९/२०१९अन्वये मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र.१/१८९ मनपा उपयोग (उद्यान) या आरक्षणाखालील ६ हे-०० आर गायरान क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात आले आहे. सदर आदेशानुसार ताब्यात आलेल्या गायरान क्षेत्रावर मंजूर विकास आराखड्यातील प्रयोजनात बदल करावयाचा असल्यास अथवा रस्ता प्रस्तावित करावयाचा असल्यास आदेशातील अटी व शर्तीनुसार शासनाच्या (महसूल विभागाची) पुर्व मान्यता घेणे आवश्यक आहे. सदर प्रस्तावित करणेत आलेल्या गट नं. ६४६,४२७, ४२८,४१९,४१५ पै मधून जाणाऱ्या प्रस्तावित १८ मी रस्त्याचा भाग मोकळा असून सदर भागात रस्ता झाल्यामुळे विकास होणेस मदत होईल असे नगर रचना या विभागाचे मत आहे. त्यामुळे सदरचा १८ मी. रुंद रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २०५ अन्वये (म्युनिसिपल रोड) रस्ता घोषित करणे आवश्यक आहे. म्हणून मौजे मोशी येथील आरक्षण क्र.१/२०७ सफारी पार्क या आरक्षणाच्या पुर्वकडील व पश्चिमेकडील दोन्ही १८.०० मी रूंद रस्ते जोडण्यास गट नं. ६४६,४२७, ४२८,४१९,४१५ पै मध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २०५ अंतर्गत १८.०० मी रूंदीचा महानगरपालिकेचा रस्ता घोषित करणेस मान्यता देणेत येत आहे. सदरचा विषय पुढील कार्यवाहीकामी नगररचना विभागाकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | ४९ | विषय क्रमांक | : | ०२ |
| दिनांक | : | २२/१२/२०२० | विभाग | : | स्थापत्य |
| सुचक | : | मा. सुवर्णा बुर्डे | अनुमोदक | : | मा. निर्मला गायकवाड |

संदर्भ     मा.सुवर्णा विकास बुर्डे यांचा प्रस्ताव

चऱ्होली येथील स.नं. ११३, ११४, २२०, २२१ येथे आरक्षण क्र. २/९२ मधील २४.०० मीटर रस्त्यावरील चौकास “सौ.सावित्रीबाई ज्योतीराव फुले चौक” असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | ५० | विषय क्रमांक | : | ०३ |
| दिनांक | : | २२/१२/२०२० | विभाग | : | लेखा/ स्थापत्य |
| सुचक | : | मा. सुवर्णा बुर्डे | अनुमोदक | : | मा. निर्मला गायकवाड |

संदर्भ मा.सुवर्णा विकास बुर्डे यांचा प्रस्ताव

चऱ्होली येथील स.नं. १ आरक्षण एम २-८ मनपा आरक्षण समाज मंदिर येथे जुने समाज मंदिर असून त्याची दुरूस्ती करणे शक्य नसल्याने नविन इमारत बांधणेसाठी २५ लक्ष एवढा निधी स्थापत्य विभागास उपलब्ध करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | ५१ | विषय क्रमांक | : | ०४ |
| दिनांक | : | २२/१२/२०२० | विभाग | : | स्थापत्य |
| सुचक | : | मा. सुवर्णा बुर्डे | अनुमोदक | : | मा. निर्मला गायकवाड |

संदर्भ मा.सुवर्णा विकास बुर्डे यांचा प्रस्ताव

चऱ्होली येथील स.नं. १ येथे आरक्षण एम २-८ मनपा आरक्षण समाज मंदिर यास “डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन, चव्हाण नगर चऱ्होली बु.” असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | ५२ | विषय क्रमांक | : | ०५ |
| दिनांक | : | २२/१२/२०२० | विभाग | : | नगर रचना /स्थापत्य |
| सुचक | : | मा. सुवर्णा बुर्डे | अनुमोदक | : | मा. निर्मला गायकवाड |

संदर्भ मा.सुवर्णा विकास बुर्डे यांचा प्रस्ताव

चऱ्होली येथील स.नं. ११२ व ११३ या भागात दाट लोकवस्ती असल्याने स्थानीक नागरीक व शेतकऱ्यांसाठी त्यांचे मालकी हक्काच्या जागेतून १८ मीटर व ३० मीटर रस्त्यास १२ मीटर जोड रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २०५ अन्वये रस्ता घोषित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | ५३ | विषय क्रमांक | : | ०६ |
| दिनांक | : | २२/१२/२०२० | विभाग | : | नगररचना/ स्थापत्य |
| सुचक | : | मा. सुवर्णा बुर्डे | अनुमोदक | : | मा. निर्मला गायकवाड |

संदर्भ मा.सुवर्णा विकास बुर्डे यांचा प्रस्ताव

चऱ्होली येथील स.नं. १५०, १५१, १५२,१५३, १५४, १५५ या भागात दाट लोकवस्ती असल्याने स्थानीक नागरीक व शेतकऱ्यांसाठी त्यांचे मालकी हक्काच्या जागेतून ९० मीटर डीपी रस्त्यापासून १८ मीटर रस्त्यापर्यंत १८ मीटर रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २०५ अन्वये रस्ता घोषित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | ५४ | विषय क्रमांक | : | ०७ |
| दिनांक | : | २२/१२/२०२० | विभाग | : | नगररचना/ स्थापत्य |
| सुचक | : | मा. सुवर्णा बुर्डे | अनुमोदक | : | मा. निर्मला गायकवाड |

संदर्भ मा.सुवर्णा विकास बुर्डे यांचा प्रस्ताव

चऱ्होली येथील २४ मीटर रस्त्यालगत स.नं. १९६, १९१ व २०० या भागात रहिवाशांच्या सोयीसाठी १२ मीटर रस्त्याची आवश्यकता असलेने स.नं. १९६, १९१ व २०० च्या हद्दीवरून १२ मीटर रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २०५ अन्वये घोषित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | ५५ | विषय क्रमांक | : | ०८ |
| दिनांक | : | २२/१२/२०२० | विभाग | : | नगररचना/ स्थापत्य |
| सुचक | : | मा. भिमाबाई फुगे | अनुमोदक | : | मा. निर्मला गायकवाड |

संदर्भ मा. भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव

भोसरी गावठाण येथील बापुजी बुआ चौक ते अग्नीशामक केंद्रा पर्यंत ९ मीटर रूंद डांबरी रस्ता आहे. सदर परिसरात शाळा, स्मशानभूमी, दवाखाना इत्यादी असलेने वाहतुक कोंडी होते. त्यामुळे सदरचा ९ मीटरचा रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २०५ अन्वये १२ मीटर रूंद घोषित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | ५६ | विषय क्रमांक | : | ०९ |
| दिनांक | : | २२/१२/२०२० | विभाग | : | स्थापत्य |
| सुचक | : | मा. हिराबाई (नानी) घुले | अनुमोदक | : | मा. निर्मला गायकवाड |

संदर्भ मा. हिराबाई (नानी) घुले यांचा प्रस्ताव

बोपखेल मधील केसरीनगर लगतच्या रस्त्यास आदिवासी क्रांतीकारक धरती आबा बिरसा मुंडा यांचे नाव देणेस तसेच गणेश कॉलनी नं. १४ रस्त्यास आद्य क्रांतीकारक राघोजी भांगरे यांचे नाव देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

यानंतर उपस्थितांचे आभार व्यक्त करून मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(विकास डोळस)
सभापती
इ प्रभाग समिती

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ प्रभाग समिती

जा.क्र.इक्षेका/ ४/कावि/ ४७० /२०२०
दिनांक : ३० /१२ /२०२०

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी

२-/सभावृत्तांतातील ठरावानुसार आपले विभागाशी संबंधित विषयाबाबत योग्य ती नियमाधिन कार्यवाही करणेत यावी. याबाबत वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.